माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक ९ वा रायगड-पनवेल दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०२१ पाने १० किंमत २० रूपये

## १५ वा वित्त आयोग, ग्रामपंचायती मालामाल

## खोटी खरेदी, हिशोब बेपत्ता, नागरिकांचे हाल !







## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, सप्टेंबर २०२१





जयंत उदकवार

यवतमाळ

## सरकारी पगारात ५० टक्के कपात करा.



मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●

शेखर कोलते
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
समीर शिरवाडकर (रत्नागिरी)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)

पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०३ प्लॉट नं.०६
हर्मोनी बिल्डींग सेक्टर ०१ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : rtimahasangh@gmail.com

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

## संपादकीय..........

## कोरोना : दहा निरिक्षणे

१. कोरोना कोठे आहे ? कोरोना नाहीच ? कोरोना हा आतरराष्ट्रीय डाव आहे ? असे अनेक शंकास्पद प्रश्न कोराना महामारी संबंधी व्यक्त केले जात आहेत. पण ज्यांच्या घरातील व्यक्ती मरण पावली आहे.ज्यांच्या घरातील कर्ता माणूस बळी गेला आहे.त्यांना विचारा मग कळेल की कोराना आहे की नाही ?

२.कोरोना च्या संसर्ग काळात अधिक काळजीपूर्वक वागणे ही नागारिक म्हणून आपली मोठी जबाबदारी आहे.पण आपण ती पार पाडीत नाही.सहलीचे ठिकाणे, पिकनीक स्पॉट या ठिकाणी अनावश्यक गर्दी करणे टाळले पाहिजे.

३.सरकारी यंत्रणा कोरानाचा बहाणा करून नागरिकांची सेवा देण्यात अडवणूक करीत आहे. सरकारी कर्मचारी व अधिकारी उठसूठ कोरोनाचा बहाणा करून नागरिकांना सेवा देत नाहीत. हेही चूक आहे.

४.कोरोना मुळे आपली आरोग्य व्यवस्था किती ठिसूळ आहे हे दिसून आले आहे.पण गेल्या तीन वर्षात राज्य व केंद्र सरकारी आरोग्य व्यवस्था ठिक करण्याबाबत गंभीर असल्याचे जाणवत नाही.

५. कोरोनाची लस घेण्याबाबत शासनांचे स्पष्ट व नागरिकांना कमी त्रास होईल असे धोरण नसल्याचे जाणवत आहे.

६.सदर लस किती गुणकारी व उपयुक्त आहे.याचा सुक्ष्म अभ्यास करणारी यंत्रणा उभी करावी यां विषयी सरकार उदासीन असून लसीकरणाचा इवेन्ट झाला आहे.

७.कोरोनामुळे किती रोजगार गेले ? अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाले ? याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

८.कोरोना सोबत घेऊन जगणे व त्यांची काळजीपूर्वक हाताळणी करणे हा आता जगण्याचा एक भाग झाला आहे.

९.आम्ही जबाबदार शासन नाही आहोत. असे कोरोनामुळे सरकारीचे पितळ उघडे पडले आहे.

१०. आम्ही जबाबदार नागरिक नाही आहोत. हे कोरोनाने अधोरेखीत केलं आहे.

# १५ वा वित्त आयोग,ग्रामपंचायती मालामाल खोटी खरेदी, हिशोब बेपत्ता,नागरिकांचे हाल !

एक एप्रील २०२० पासून पंधरावा वित्त आयोग सुरू झालेला आहे.या वित्त आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार सरकारकडून ग्रामपंचायतीला थेट अनुदान येतं. २०२०-२१ या वर्षात देशातील अडीच लाख ग्रामपंचायतीला साठ हजार सातशे पन्नास हजार कोटी रूपये वितरीत करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात एकूण अठ्ठाविस हजार तीन ग्रामपंचायती असून प्रत्येक ग्रामपंचायतीला सरासरी किमान ४ लाख ते कमाल १८ लाख रूपये वार्षिक अनुदान मिळाले आहे.पुढील पाच वर्ष म्हणजे ३१ मार्च २०२५ पर्यंत हे अनुदान असेच दरवर्षी देशातील सर्व ग्रामपंचायतीना भेटत राहणार आहे.यातून गावाच्या विकासाला गती येणार आहे.

१५ वित्त आयोगाची रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यात येऊ लागल्या पासून ग्रामपंचायती मालामाल होऊ लागल्या आहेत.गावाचा सरपंच आता मिनी आमदार झाला आहे. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार देशाच्या तिजोरीचा हिस्सा थेट गावाच्या ग्रामपंचायतीच्या बँक खात्यावर येऊ लागला असून १५ वित्त आयोग व त्यातून ग्रामपंचायतीकडे आलेली लाखो रूपयांची रक्कम हा गावातील चर्चेचा हॉट विषय झालेला आहे.

१५ व्या वित्त आयोगाची रक्कम १.केव्हा आली ? २.किती आली ? ३.कोणत्या खात्यात ठेवली ? ४.कोणत्या कामासाठी खर्च करता झाली ?५.प्रत्यक्षात खर्च झाली की केवळ कागदावरच खर्च झाली ? अशी कुजबूज व चर्चा प्रत्येक गावातील गावकऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात सुरू असून सरपंच व ग्रामसेवक मात्र ग्रामसभेत किंवा गावकऱ्यांसमोर हिशोब मांडण्यास तयार नाहीत.

अर्थात याला काही अपवाद आहेत.पण अपवादाने तर नियम सिद्ध होतो.

१५ व्या वित्त आयोगांच्या रिपोर्टमध्ये प्रकरण सात मध्ये ग्रामपंचायतीना कसे केव्हा व किती अनुदान येत राहील यांची मार्गदर्शक तत्वे व सविस्तर मिमांसा दिली आहे. १५ वित्त आयोगाचा हिंदी भाषेतील संपूर्ण रिपार्ट दिला आहे तसेच महाराट्र




## १५ वा वित्त आयोग

करातील वाटा ठरवण्यासाठी खालील आधार ठरवण्यात आले

१. लोकसंख्या : १५%
२. क्षेत्रफळ : १५%
३. वने आणि पर्यावरण : १०%
४. उत्पन्न तफावत : ४५%
५. लोकसंख्या कामगिरी : १२.५
६. कर प्रयत्न : २.५

शासनाने काढलेले शासन आदेश दिलेले आहे.ते गुगल वर उपलब्ध आहेत जिज्ञासूनी पहावेत.हा लेख बनविताना त्याचा आधार घेतला आहे.

१५ वित्त आयोगाविषयी काही मुद्दे प्रत्येक ग्रामस्तांना माहिती पाहिजेत त्या पुढील प्रमाणे.

मुद्दा नं १.२०११ साली झालेल्या जनगणणेमध्ये गावाची लोकसंख्या किती होती.त्या आधारावरुन ग्रामपंचायतला हा निधी मिळतो. तुमच्या गावाला कोणत्या वर्षात किती निधी मिळाला हे तुम्ही तुमच्या मोबाईलवरील ई-स्वराज ॲप डाऊनलोड करून या ॲपवर जाऊन तपासू शकता.

# १५ वा वित्त आयोग,ग्रामपंचायती मालामाल

मुद्दा नं २. १५ वित्त आयोगाचा निधी सरपंच व ग्रामसेवक यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत काढलेल्या बचत खात्यात सरकारकडून थेट जमा केला जातो.

मुद्दा नं ३.ग्रामपंचायतीला दोन प्रकारचे अनुदान मिळते १.बांधीव अनुदान ( टाईड ग्रँट ) २. बेसीक ग्रँट मूलभूत अनुदान हे अनुदान गावासाठी मंजूर झालेल्या विकास आराखड्यास अनुरूप होईल अशा विकास कामासाठी वापरायचे /खर्च करायचे आहे.

मुद्दा नं ४.बांधीव अनुदान ( टाईड ग्रँट) हा निधी प्राधान्याने गावांची मलनिस्सारण , स्वच्छता तसेच हागणदारी मुक्त योजना चालविणे तसेच गावात पाणी पूरवठया संबंधी सर्व कामे उदा.पेयजल योजना,जलपूर्नभरण, रेणवॉटर हार्वेस्टिंग, वॉटर रिसायकलींग इत्यांदी सबंधीत विकास कामासाठीच वापरता येईल.बांधीव निधी कोठे वापरता येइल याची शासनाने सूचवलेल्या कामाची यादी या व्हिडीओच्या खाली डिस्क्रपीशन मध्ये दिली आहे.

मुद्दा नं ५. बेसीक ग्रँट अर्थात मुलभूत अनुदान हे गावांतील स्थानिक गरजेनुसार विविध लहान मोठ्या विकास कामासाठी मुक्त वापरता येईल. मात्र यातून कर्मचाऱ्यांचे पगार व आस्थापना खर्च म्हणजेच कार्यालयीन खर्च करता येणार नाहीत.बेसीक ग्रँड मधून कोणती कामे करता येतील याची शासनाने सूचवलेली कामाची यादी आपण पहावी.

मुद्दा नं ६. १५ वित्त आयोगाच्या अनुदानांतून करावयाच्या विकास कामाच्या नियोजनाचे अधिकार व जबाबदारी ग्रामपंचायतीच्या पंच कमिटीची असेल,मात्र ग्रामपंचायत पंच कमिटीने घेतलेले निर्णय व त्यांची झालेली अंमबजावणी याची माहिती वेळोवळी ग्रामसभेत सर्व गावकऱ्यासमोर सादर करणे ही ग्रामपंचायतची जबाबदारी असेल.मुद्दा नं ७. शासनाने विहीत केलेल्या बाबीसोडून अन्य ठिकाणी सदर निधी खर्च झाल्यास सदर खर्चास जबाबदार असणाऱ्या सरपंच व ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

मुद्दा नं ८. १५ वित्त आयोगाच्या निधीमधून जे कार्यक्रम /बाबी /योजना / विकास कामे सुरू असतील त्या ठिकाणी त्या योजनेचे नाव व त्यासाठी होत असलेल्या खर्चाच्या रक्कमेचा आकडा याचा एक माहितीपर फलक लावणे बंधनकारक आहे.

मुद्दा नं ९.१५ व्या वित्त आयोगामधील निधीतून ग्रामपंचायती मार्फत खरेदी केलेल्या वस्तू / पूर्ण केलेल्या योजना/ विकास कामे / इत्यादी निकषाप्रमाणे असल्याचे तपासून त्याचे हिशोब तसेच आर्थिक व भौतिक अहवाल तालूका गट विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे मार्फत प्रत्येक महिन्याला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवले पाहिजेत असा महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे.

मुद्दा नं १० पंधराव्या वित्त आयोगांच्या अनुदानातून ग्रामपंचायत स्तरावर पूर्ण झालेल्या किंवा होत असलेल्या कामाच्या तक्रारी चे तात्काळ निवारण व्हावे यासाठी जिल्हा परिषद स्तरावर मुख्या कार्यकारी अधिकारी यांनी तक्रार निवारण कक्ष सुरू करावा व तक्रारीचे निवारण वेळेच्या वेळी करावे असे शासनाने निर्देश आहेत.

खूप गांवामध्ये सरंपच व ग्रामसेवक यांनी निधी कागदावर खर्च केला आहे. म्हणजे प्रत्यक्षात वस्तू खरेदी केलेल्या नाहीत किंवा प्रत्यक्षात विकास काम केलेलेच नाही.अशा तक्रारी आहेत.अशा नागरिकांनी त्यांच्या तक्रारी गट विकास अधिकारी यांचेकडे कराव्यात.

१५ वित्त आयोगातून आलेले निधीमधून ग्रामपंचायतीने केलेल्या खर्चाचे गट विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवलेले आर्थिक व भौतिक अहवालच्या प्रती माहितीचा अधिकार वापरून मागाव्यात.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील तक्रार कक्षाकडे तक्रार करावी.

# सरकारी पगारात ५०टक्के कपात करा.

हा लेख वाचून याला प्रचंड विरोध होऊ शकतो. मतभेद होऊ शकतात.पण यातील कंटेंट रिसर्च बेस आहे.हा व्हिडीओ बनवितांना सातव्या वेतन आयोगाचा अहवाल,**(Report of the Seventh Central Pay Commission)** केंद्र शासनांचा पगार भत्ते व अन्य सुविधा अहवाल तसेच महाराष्ट्र शासनाचा राज्य वेतन सुधारणा समिती अहवाल केंद्र सरकारचे अर्थसंकल्प अशा मूळ दस्ताऐवजांचा आधार घेतला आहे.

या व्हिडीओचा मूळ संदेश हो आहे की ,सर्व सरकारी अधिकारी व कर्मचारी ज्यांचा एकत्रीत पगार पन्नास हजार रूपयापेक्षा अधिक आहे.त्यांचा पगार तातडीने पन्नास हजारांची कॅप लावून पगार कपात करण्यांची नितांत गरज आहे. कोणत्यही सरकारी कर्मचारी व अधिकारी यांना पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक पगार असणार नाही.असा धोरणात्मक निर्णय तातडीने घेतला गेला पाहिजे. नाहीतर देशावर लवकरच आर्थिक अराजक येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

देश कोविड मुळे अभूतपूर्व संकटात आलेला आहे. गेले दीड वर्षे झाले लॉकडाऊन मुळे रोजगार व व्यवसाय व खासगी क्षेत्रातील लहान व मध्यम व्यवसायिक यांनी प्रचंड वित्तीय हाणी झालेली आहे. लाखो लोकांचे खासगी रोजगार व स्वयंरोजगार बंद झालेले आहेत. देशाचे सकल राष्ट्रीय जीडीपी उत्पन्न उणे पातळीवर आलेलं आहे.अशा अभूतपूर्व संकटाच्या वेळी भारतीय संविधानामध्ये ३६० कलमान्वये आर्थिक आणीबाणी लावून सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात कपात करण्याची तरतूद आहे. ही तरतूद तातडीने अंमलांत आणण्यांची गरज आहे.या तरतूदीच्या माध्यमातून वाचवलेला पैसा खासगी नोकर व व्यावसायिक यांच्या पुनवर्सनासाठी वापरला पाहिजे. नसता पुढील काही काळात कोवीड चा फटका बसून अर्थिक घडी विस्कटलेल्या लोकांच्या आत्महत्या सुरू होण्याची भीती आहे.

गेल्या दीड वर्षापासून कोविड परिस्थितीचा सर्वांवर प्रचंड असा आर्थिक व मानसिक ताण-तणाव आलेला आहे. परंतु जे केंद्र किंवा राज्य सरकारचे कर्मचारी किंवा अधिकारी हा जो वर्ग आहे.फक्त त्या वर्गांचंच कसलंही आर्थिक नुकसान झालेलं




नाही.

कर्मचाऱ्यांचे वेतन,निवृत्ती वेतन व कर्जावरील व्याज हे तीन घटक अर्थव्यवस्थेसाठी फारच धोकादायक ठरलेले आहेत. केंद्र सरकारचे कर्मचारी साधारणत: पन्नास लाख इतके आहेत. त्यांच्या पगारावर १० टक्के पेंशन ६ टक्के व कर्जाचे व्याज देण्यासाठी १८ टक्के खर्च होतो. तसेच देशातील तीस राज्यामधील राज्य सरकारचे एकूण साडेचार कोटी नोकर आहेत. असे मिळून एकूण देशभरात साधारणत: पाच कोटी सरकारी नोकर आहेत. सर्वच राज्य सरकारांचा पगारावर त्या,त्या राज्यांच्या एकूण उत्पनांच्या साधारणत: ४० ते ५० टक्के रक्कम खर्च होत आहे.व उरलेल्या ५० टक्के उत्पन्नातून साधारणत: २५ ते ३० टक्के अन्य खर्च भागविण्यासाठी वापरली जाते. मग त्यांनंतर देशांच्या विकास योजनावर खर्च करण्यासाठी सरकारांच्या हातात केवळ १५ ते २० टक्के रक्कम उरते. महाराष्ट्र राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवालात म्हटलं आहे की राज्याची पन्नास टक्के कमाई ही वेतन,पेन्शन व व्याज या वर खर्च होत आहे. देशांचं उत्पन्न सतत वाढलं पाहिजे पण त्याच बरोबर

# सरकारी पगारात ५०टक्के कपात करा.

देशांच्या उत्पन्नावर देशातील सगळ्या लोकांचा समान व प्रमाणशीर व न्याय हक्क असला पाहिजे. हे कोणत्याही देशांच्या अर्थव्यवस्थेचं मूलतत्व असतं.गेल्या पन्नास वर्षात वेतन आयोगांच्या गोंडस नावाखाली नोकरशाहीने स्वत:चं वेतन प्रचंड वाढवून या मूलतत्वांलाच हरताळ फासला गेला आहे.१३०कोटी लोकसंख्येपैकी देशांच अर्ध उत्पन्न फक्त पाच कोटी सरकारी नोकर व त्यांचे पंधरा कोटी कुटुंबीय खातात. बाकीच्या ११० कोटी लोकांच्या हातात फारसं काही येत नाही.सरकारी नोकर पोटभरून खातात त्याच वेळी पोटाला चिमटा घेऊन सरकारचा जीएसटी,इंधन कर व आयकर भरणाऱ्या अन्य करोडो भारतीयांच्या ताटात सरकारकडून एक छोटा तूकडा ही लवकर येत नाही ही खंत आहे. आत्ताच केंद्र सरकारवर शंभर लाख कोटी रूपयांचे कर्ज आहे. जन्म घेणारं प्रत्येक बाळ हे अंगावर एक लाख रूपयांच सरकारी कर्ज घेऊन जन्म घेत आहे. नोकरदारांची पगार कपात न केल्यास कर्जाच्या ओझ्याने देश बूडून जाईल.आजच वेलफेअर स्टेट या व्याख्येला काहीही अर्थ राहिलेला नाही.

म्हणून गेल्या पंचवीस वर्षात देशातील सरकारी विकास कामाची गती प्रचंड मंदावली आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात सरकारने खासगीकरणासाठी दरवाजे उघडे केले आहेत.

आपली सरकारी आरोग्य व्यवस्था किती ढिसाळ आहे हे कोवीड काळात आपण पहिलं आहे.कोवीड काळात देश आर्थिक संकटात असतानाही आमच्या भरमसाठ पगारी कमी करा.आणि त्यातून बचत झालेला पैसा हा देशाची आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी वापरा. देशात आर्थिक आणीबाणी लावा. आम्ही देशासाठी त्याग करायला तयार आहोत.असं आवाहन एकाही सरकारी नोकरदारांने केंलं नाही.पाच कोटी सरकारी नोकरामध्ये एकही माई का लाल देशांसाठी पगारातील एक रुपयांचा सुद्धा त्याग करण्यासाठी तयार नाही. ही फारच शरमेची बाब आहे.

त्यामुळे आत्ता एक निणर्य तातडीने घेण्याची अत्यंत अशी आवश्यकता आहे.

आज आत्ता ताडबतोब देशामध्ये संविधानातील अनुच्छेद - ३६० नुसार आर्थिक आणीबाणी लावून देशातील सर्व सरकारी नोकरदारांचे पगार अर्धे कमी करण्यांचा क्रांतीकारी निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे. त्यातून बचत झालेला संपूर्ण पैसा हा लॉकडाऊन मुळे ज्यांचे नुकसान झाले ते सर्व खासगी नोकरदार,शेतकरी,शेतमजूर,यांना मदत म्हणून दिला पाहिजे. तरच लॉकडाऊन मध्ये पिचलेला गरीब व मध्यमवर्ग भारतीयांना खरा दिलासा मिळेल व आपल्याा देशाची बिघडलेली आरोग्य व्यवस्था व शिक्षण व्यवस्था निटनेटकी करण्यासाठी तरतूद होऊ शकेल.

आज देशात आरोग्यव्यवस्था का नीट नाही ? उत्तर आहे.तर पैसा नाही. शिक्षण व्यवस्था का नीट नाही ? पैसा नाही. न्याय व्यवस्था का नीट नाही ? तर पैसा नाही रस्ते का निट नाहीत ? तर पैसा नाही.

विकासासाठी पैसा नाही, लोकांच्या हितासाठी पैसा नाही. सर्वसामान्यांचा प्रश्न येतो तेव्हा सरकारची तिजोरी रिकामी असते.तिजोरीत फक्त खडखडाट असतो.

पण जेव्हा सरकारी कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा पगार करायचा असतो तेव्हा सरकार ओव्हरड्राफ्ट काढते,कर्ज काढते पण पगार करते म्हणजे करते. आणि हे वाढलेलं कर्ज समान्य भारतीयांच्या डोक्यावर बसतं. सद्या कोविडमुळे देश कोलमडून पडला आहे.तेव्हा सर्व केंद्रीय व राज्य सरकार मधील वर्ग -१ वर्ग -२ व वर्ग -३ या कॅटेगिरीतील सर्वांच्या पगाराला ५० हजारांची कॅप घाला. ही व्यवस्था पुढील किमान तीन वर्षेसाठी लागू करा.मग पहा, आर्थीक आणिबाणी मुळे वाचलेल्या पैशातून आरोग्य व शिक्षण व अन्य विकास सुविधासाठी तरतूद तयार होईल व मग देशावर कितीही मोठं सकंट आलं तरी देश आर्थिक दृष्टीने समर्थ असेन.हा एकच व एकमेक उपाय आहे. दुसरा पर्याय नाही.

## व्हॉटस्ॲप ग्रुपची कमाल !

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या लढ्याल्या यश !

आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ मध्ये असून अनेक चांगली माहिती आपल्याला या ग्रुप मधून मिळते.

शेखर सर आणि सुभाष सर यांचेही मौलिक मार्गदर्शन मिळते आणि आप्ल्या ज्ञानात भरघोस भर पडते.

हीच गोष्ट विचारत घेवून मी माझ्या केंदळ खुर्द तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर या छोट्याशा गावात आर टी आय केंदळ खुर्द या नावाने व्हॉटसॲप ग्रुप १६ नोव्हेंबर २०२० रोजी तयार केला.

मी पुण्याला कामानिमित्त राहत असून गावातल्या ग्रुप ला रोज माहिती पेपर बातमी माहिती अधिकार कायदा चे व्हिडिओ ग्रुप वर टाकत राहिलो

अनेकांना ते आवडले कुणीही ग्रुप सोडायला तयार होत नव्हते हळूहळू ग्रुप ची सभासद संख्या वाढायला लागली.मला लोक फोन करायला लागले मला आर टी आय ग्रुप मध्ये एड करा.४ लोकांचा ग्रुप ३० संख्या वर गेला.

गावातल्या ग्रामपंचायत ला मी विविध विषयावर माहिती अधिकार अर्ज करून आलेली माहिती ग्रुपवर टाकत राहिलो.

अशीच कृती पाहून विरेष आढाव या युवकाने लढा देण्यास सुरवात केली.त्याला माहिती देण्यास ग्रामपंचायत टाळाटाळ करायला लागली.

त्याला ग्रामपंचायतीला नेमकी तक्रार कशी करायची याचे मार्गदर्शन केले.पाणी रस्ते आरोग्य पाइपलाइन अश्या विविध समस्या कित्येक वर्षापासून प्रलंबित होत्या. आहेत.

यावर उपाय म्हणून मग विरेश आढाव या युवकांनी लोकशाही मार्गाने लढा द्यायचा निर्धार केला.आणि ग्रामपंचायतीमध्ये चाललेल्या अनियमितता व भ्रष्टाचाराविरोधात उपोषण करायचे ठरविले.

अखेर उपोषणाचा मार्ग त्या कार्यकर्त्याने स्वीकारला आणि १५ ऑगस्ट रोजी उपोषणाचे नियोजन ठरले

पण राजकारण्यांनी पोलिस पाठबळ हाताशी धरून उपोषणास बसले तर अटक करू असे पत्र दिले.

पोलीसांचे पत्र पाहून विरेश आढाव घाबरून जाईल असा राजकारण्यांचा डाव होता.


मी विरेश आढाव यांनी गावासाठी अटक काय आपण मरण पत्करू असे सांगितले.

पोलीस प्रशासनाला न जुमानता १५ ऑगष्ट रोजी विरेश आढाव यांनी केंदळ खुर्द येथे उपोषणाला सुरवात केली.

आणि प्रशासनाने तत्काळ मीटिंग घेवून २ तासात ग्रामपंचायत ला सांगितले की सदर सर्व मागण्या दोन महिन्यात पूर्ण करून द्या.

ग्रामपंचायत ने लेखी पत्र देवून उपोषण सोडण्यास सांगितले.




आणि सर्व मागण्या मान्य केल्या असून आर टी आय चा हा मोठा विजय आहे

असे विरिश आढाव यांनी सांगितले.

या उपोषणामुळे गावातील युवकांचा आत्मविस्वास वाढला असून या पुढे गावातील रस्ते,पाणीपूरवठा, गावांची सफाई, दिवाबत्तीची सोय,विविध विकासांची कामे,पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीचा सुयोग्य व कायदेशीर वाटप,गावांचा अर्थ संकल्प, विकास आराखडा,ग्रामसभेमध्ये सहभागी होणे इत्यादी विषय या पुढे मार्गी लावण्यांचा निर्धार युवकांनी घेतला आहे.



# जयंत सोमेश्वर उदकवार

## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, सप्टेंबर २०२१



जयंत उदकवार हा यवतमाळ जिल्ह्यातील झरी जामणी तालुक्यातील मार्की बुद्रूक गावांतील रहिवाशी असणारा युवक आहे.
कोठेही अन्याय व अत्याचार दिसला की जयंत अस्वस्थ होतो. त्यांच रक्त उसळून उठतं.
हर जोर-जूल्म की टक्कर में संघर्ष हमारा नारा है ! असा आवाज देत मग जयंत पेटून उठतो.
जयंत धडपडणारा युवक आहे. तो चांगला पत्रकार आहे. तो सोशल मिडीयावर ॲक्टीव असतो.
इतकंच नाही तर जयंत हा उच्चशिक्षित आहे. त्यांन मायनिंग इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलंलं आहे.
काही वर्षापूर्वी गावातील ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक घोटाळा झाला. गरीब लाभार्थ्यांचे अनुदान काही बड्या पुढाऱ्यांनी हडप केलं तर जयंत ने माहितीचा अधिकार वापरून हा घोटाळा बाहेर काढला.
गरीब व गरजु गावकऱ्यांना जागृत करण्याचे काम जयंत ने केलं. व ते सतत चालूच राहणार आहे.
माहिती अधिकार कायद्याचा झरी जामणी तालूका व यवतमाळ जिल्ह्यात प्रचार प्रसार व्हावा. म्हणून जयंत उदकवार यांनी तालुक्यात चांगली टीम उभी केली आहे. परिश्रम घेतले आहेत.
जयंत ची सामाजिक जाणीव फार चांगली आहे. इतरांच्या उपयोगाला यायला मदत करायला त्याला आवडते.
झरी जामणी तालुक्यातील मूकूटबन हा परिसर खनिजसंपत्तीने समृद्ध असून या भागातून मोठ्या प्रमाणात खनिज संपत्तीचे उत्खणण होत असते. परंतु त्यांच बरोबर या कामात फार मोठी बेकायदेशीर आर्थिक उलाढाल ही होत असते. जयंत ने त्यांच्या लेखणीतून असे प्रकार नेहमीच जनतेसमोर ठेवले आहेत.
या परिसरात मोठमोठ्या कार्पोरेट कंपन्या असून त्या स्थानिक युवकांना रोजगारांची संधी देत नाहीत. या विरोधात जयंत ने आवाज उठवला असून परिसरातील सुशिक्षित युवकांना संघटीत करून आमच्या हक्काचा रोजगार द्या या मागणीसाठी स्थानिक भूमीपूत्रांचा लढा उभारला आहे.
हा लढा उभारताना स्थानिक युवकांचे पोलिसाकडून खच्चिकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. खंडणीच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देण्यात आली. पोलीसांनी कारवाईचा धाक दाखविला पण जयंतने या विरोधात पोलीस प्रशासनातील वरीष्ठांकडे सदर प्रकरण नेलं आणि पोलीसांचा धाक व चूकीच्या पद्धतीने आंदोलन हाताळणी विरोधात सर्व शक्ती पणाला लावून त्याच्यातील नेतृत्वगुणांची चमक दाखवून दिली.
रोजगार आंदोलनात मी उच्च शिक्षित आहे व भूमिपूत्रही आहे. मी पूर्ण हक्कदार असूनही मला व्यक्तीश रोजगार नाही मिळाला तरी चालेल पण परिसरातील युवकांना भूमिपूत्रांना ८० टक्के नोकऱ्या राखीव ठेवण्यांच्या सरकारच्या धोरणाप्रमाणे रोजगार मिळाला पाहिजे ही जयंत ची भूमिका आहे.
अनेक संकटे आलीत व येणार आहेत. पण जयंत हा रडणारा नव्हे तर लढणारा कार्यकर्ता आहे.
जयंत तूला सामाजिक काम करतांना खूप आत्मबळ मिळो या शुभेच्छा.
जयंतला माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने साप्टेंबर २०२१ या महिन्याचा सर्वोत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येत आहे. जयंत चे अभिनंदन !


## रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.

## www.instamojo.com/subhashbaswekar


















# www.rtimahasangh.weebly.com

# www.facebook.com/rtimahasangh/

## Whats App - 9223516920

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४-बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले.
RNI रजि नं. MAHMAR/2011/40781